२)	डॉ. राजेश एस. जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य	
३)	डॉ. एफ. सी. रघुवंशी	-	सदस्य	
४)	डॉ. डी. डब्ल्यू. निचीत	-	सदस्य	
५)	डॉ. ए. बी. मोहरील	-	सदस्य	
६)	डॉ. मनीषा पी. काळे	-	सदस्य	
७)	डॉ. दिनेश भोंडे	-	सदस्य	
८)	डॉ. बी. पी. पाटील	-	सदस्य	
९)	डॉ. विलास राऊत	-	सदस्य	(दि. २३.१०.२०१९ पासून)
१०)	डॉ. सी.एम. जाधव	-	सदस्य	(दि. २३.१०.२०१९ पासून)
११)	डॉ. एस. डी. कतोरे	-	सदस्य	(दि. २३.१०.२०१९ पासून)
१२)	डॉ. संजय खडक्कर	-	सदस्य	(दि. २३.१०.२०१९ पासून)
१३)	संचालक, (उच्च शिक्षण)	-	सदस्य	
१४)	डॉ.एच.आर. देशमुख	-	सदस्य -सचिव	

११) माहिती तंत्रज्ञान मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य
३)	डॉ. डी. डब्ल्यू. निचीत	-	सदस्य
४)	डॉ. अविनाश मोहरील	-	सदस्य
५)	डॉ. मनीषा पी. काळे	-	सदस्य
६)	डॉ. एच. आर. देशमुख	-	सदस्य
७)	डॉ. बी. डी. कऱ्हाड	-	सदस्य
८)	डॉ. एस. एस. शेरेकर	-	सदस्य
९)	डॉ. नितीन कोळी	-	सदस्य
१०)	डॉ. शीतल धांडे	-	सदस्य
११)	डॉ. तुषार देशमुख	-	सदस्य
१२)	डॉ. एफ.सी. रघुवंशी	-	सदस्य-सचिव

१२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश एस जयपूरकर प्र - कुलगुरू	-	सदस्य
३)	डॉ. एफ. सी. रघुवंशी	-	सदस्य
४)	डॉ. डी. डब्ल्यू. निचीत	-	सदस्य
५)	डॉ. अविनाश मोहरील	-	सदस्य
६)	डॉ. मनीषा पी. काळे	-	सदस्य
७)	डॉ. अनिता पाटील	-	सदस्य
८)	डॉ. उदय नावलेकर	-	सदस्य
९)	डॉ. के. के. डेबनाथ	-	सदस्य
१०)	डॉ. डी. टी. इंगोले	-	सदस्य-सचिव

१३) नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश एस. जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य
३)	डॉ. एफ. सी. रघुवंशी	-	सदस्य
४)	डॉ. दिनेश डब्ल्यू. निचीत	-	सदस्य
५)	डॉ. अविनाश बी. मोहरील	-	सदस्य
६)	डॉ. मनीषा. पी. काळे	-	सदस्य
७)	डॉ. एस. व्ही. डुडुल	-	सदस्य
८)	डॉ. दीपक एस. धोटे	-	सदस्य
९)	श्री. मिलींद घारड	-	सदस्य
१०)	डॉ. राजेश सांभे	-	सदस्य
११)	डॉ. डी.टी. इंगोले	-	सदस्य-सचिव

१४) विद्यार्थी विकास मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य
३)	डॉ. विनोद इंदुरकर	-	सदस्य
४)	श्री. पराग घोंगे	-	सदस्य
५)	डॉ. राजीव बोरकर	-	सदस्य
६)	डॉ. सौ. जयश्री वैष्णव	-	सदस्य
७)	डॉ. रेखा मग्गीरवार	-	सदस्य
८)	डॉ. अनुप शर्मा	-	सदस्य
९)	डॉ. प्रफुल्ल गवई	-	सदस्य
१०)	डॉ. प्रसाद खानझोडे	-	सदस्य
११)	डॉ. ठाकसेन राजगुरे	-	सदस्य
१२)	डॉ. राजेश उ. बुरंगे	-	सदस्य
१३)	डॉ. दिनेशकुमार सातंगे	-	सदस्य-सचिव

१५) क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य
३)	श्री प्रमोद चांदूरकर	-	सदस्य
४)	डॉ. धनंजय वेळूकर	-	सदस्य
५)	डॉ. संजय लोखंडे	-	सदस्य
६)	जिल्हा क्रीड़ा अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती.	-	सदस्य
७)	डॉ. तनुजा एस. राऊत	-	सदस्य
८)	प्रा. प्रदीप दा. खेडकर	-	सदस्य
९)	प्रा. सुनील ए. डंभारे	-	सदस्य
१०)	डॉ. अविनाश असनारे	-	सदस्य-सचिव

१६) संशोधन मंडळ

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	डॉ. मुरलीधर चांदेकर कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	डॉ. राजेश जयपूरकर प्र-कुलगुरू	-	सदस्य
३)	डॉ. एफ. सी. रघुवंशी	-	सदस्य
४)	डॉ. डी.डब्ल्यू. निचीत	-	सदस्य
५)	डॉ. अविनाश बी. मोहरील	-	सदस्य
६)	डॉ. मनीषा. पी. काळे	-	सदस्य
७)	डॉ. श्रीमती वर्षा एन. नाठार	-	सदस्य
८)	डॉ.एस.के. ओमनवार (नियमित-०९.०१.२०२० पासून)	-	सदस्य
९)	डॉ.सुनील यादवराव कुटे (नियमित-०९.०१.२०२० पासून)	-	सदस्य
१०)	डॉ. आर. बी. बिनीवाले	-	सदस्य
११)	डॉ. उदय साळुंके	-	सदस्य
१२)	डॉ. श्रीमती विद्या शर्मा	-	सदस्य
१३)	डॉ. संतोष कुटे	-	सदस्य
१४)	डॉ. श्रीराम एम. भुस्कुटे	-	सदस्य
१५)	डॉ. धनंजय पांडे	-	सदस्य
१६)	श्री. प्रफुल्ल सावला	-	सदस्य
१७)	श्री. कमलेश डागा	-	सदस्य
१८)	वैद्य जयंत वाय देवपुजारी	-	सदस्य
१९)	श्री गोविंद पांडे	-	सदस्य
२०)	श्री. गोविंद जोग	-	सदस्य
२१)	डॉ. डी. टी. इंगोले	-	सदस्य-सचिव

१७) विद्यार्थी परिषद

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवड :

सत्र २०१९-२०२० करिता दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ ला शासनाचे आदेशाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

१८) तक्रार निवारण समिती

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार)

१)	कु. व्ही.एन. तांबी सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश	-	अध्यक्ष
२)	डॉ. एफ. सी. रघुवंशी	-	सदस्य
३)	प्रा. दिनेश सूर्यवंशी	-	सदस्य
४)	डॉ. टी. आर. देशमुख,	-	सदस्य
५)	डॉ. आर. डी. सरोदे	-	सदस्य
६)	श्री. अजय ब. देशमुख	-	सदस्य
७)	श्री. मंगेश म. जायले, उपकुलसचिव (विधी)	-	सदस्य - सचिव

१९) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी

अ.क्र.	पदाचे नांव	अधिकाऱ्याचे नांव	कालावधी
१.	मा. कुलगुरू	डॉ. मुरलीधर चांदेकर	
२.	प्र-कुलगुरू	डॉ. राजेश एस. जयपूरकर	
३.	कुलसचिव	डॉ. तु. रा. देशमुख	
४.	**विद्याशाखांचे अधिष्ठाते**		
	अ. विज्ञान व तंत्रज्ञान	डॉ. फु. चं. रघुवंशी	
	ब. वाणिज्य व व्यवस्थापन	डॉ. दि. वा. निचीत	(तदर्थ)
	क. मानव विज्ञान	डॉ. अ. भा. मोहरील	
	ड. आंतर विद्याशाखीय अभ्यास	डॉ. मनीषा प्र. काळे	(तदर्थ)
५.	संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ	डॉ. हे. रा. देशमुख	
६.	संचालक, ज्ञानस्रोत केंद्र	डॉ. मो. रा. खेरडे	
७.	वित्त व लेखा अधिकारी	डॉ. भा. द. कऱ्हाड	
८.	संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार	डॉ. श्री. सा. पाटील	
९.	संचालक, विद्यार्थी विकास	डॉ. दिनेशकुमार ना. सातंगे	
१०.	प्र.संचालक, मानव संसाधन विकास केंद्र	डॉ. प्र. अ. वाडेगावकर	
११.	संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ	डॉ. दि. तू. इंगोले	
१२.	संचालक, राष्ट्रीय सेवा योजना	डॉ. रा. उ. बुरंगे	(अतिरिक्त कार्यभार)
१३.	उपकुलसचिव (विद्या)	श्री. दि. स. राऊत	दि. ०३.०७.२०१९ मध्यान्हपूर्वपर्यंत
		श्री. मं. के. वरखेडे	दि. ०३.०७.२०१९ ते २७.०७.२०१९ पर्यंत (अतिरिक्त कार्यभार) दि. २९.०७.२०१९ मध्यान्होत्तरपासून नियमित
१४.	उपकुलसचिव (प्रशा.)	श्री. प्र. वा. राठोड	
१५.	उपकुलसचिव (विकास)	श्री. मं. के. वरखेडे	दि.२९.०७.२०१९ पर्यंत
		श्री. वि.रा. मालवीय	दि.३०.०७.२०१९ पासून
१६.	उपकुलसचिव (म.वि.)	श्रीमती सु. वि. पाटील	
१७.	उपकुलसचिव (सारणी)	श्री. ऋ. व. दशमुखे	दि. ७.११.२०१९ पर्यंत

अ.क्र.	पदाचे नांव	अधिकाऱ्याचे नांव	कालावधी
१८.	उपकुलसचिव (अंकेक्षण)	श्री. ऋ. व. दशमुखे	दि. ७.११.२०१९ मध्यान्होत्तरपासून
१९.	उपकुलसचिव (विधी)	श्री. मं.म. जायले	
२०.	उपकुलसचिव (लेखा)	डॉ. नि.अ. कोळी	
२१.	उपकुलसचिव (नामांकन)	श्री. वि.रा. मालवीय	दि.२९.०७.२०१९ पर्यंत
२२.	उपकुलसचिव (भांडार)	श्री. दा.रा. चव्हाण	
२३.	सहा.कुलसचिव (मावक)	श्री.सं.अ. अेरंडे	
२४.	सहा. कुलसचिव (नामांकन)	श्री. सु.रा. बंड	दि.२९.०७.२०१९ मध्यान्होत्तर ते ॅ २९.०१.२०२० मध्यान्हपूर्व पर्यंत अतिरिक्त कार्यभार
२५.	सहा. कुलसचिव (गोपनीय)	श्री. नि. म. बारस्कर श्री. अ. रा. काळबांडे	 दि.०७.११.२०१९ पर्यंत
२६.	सहा.कुलसचिव (सारणी)	श्री.अ.रा. काळबांडे	दि.०७.११.२०१९ मध्यान्होत्तरपासून
२७.	सहा.कुलसचिव (परीक्षा)	सौ. मि.ह. मालधुरे	दि.२९.०१.२०२० मध्यान्हपूर्व पर्यंत
२८.	सहा.कुलसचिव (नामांकन)	सौ.मि.ह. मालधुरे	दि.२९.०१.२०२० मध्यान्होत्तरपासून
२९.	सहा. कुलसचिव (प्रशा.)	श्री.र.जा. सयाम	
३०.	सहा.कुलसचिव (आचार्य कक्ष)	श्री.सु.रा. बंड	
३१.	सहा. कुलसचिव (म.वि.)	डॉ.रा.उ. येवतीकर	
३२.	सहा. कुलसचिव (प./चौ.)	मो.ध. तोटे पाटील	
३३.	सहा. कुलसचिव (वित्त)	डॉ. वि. भि. निमजे	
३४.	सहा. कुलसचिव (परीक्षा)	श्री. रा. म. नरवाडे	
३५.	सहा. कुलसचिव (विधी)	श्री. प्र. उ. तालन	
३६.	सहा. कुलसचिव (परीक्षा)	श्री. दि.पं. वानखडे	दि.०१.०७.२०१९ पासून
३७.	कार्यकारी अभियंता	श्री. श. गु. रोडे	
३८.	प्रमुख, संगणक केंद्र	श्री. दिनेशकुमार जोशी	
३९.	यंत्रणा विश्लेषक (संगणक केंद्र)	श्री. ना. श. खान	
४०.	कार्यक्रमकर्ता (संगणक केंद्र)	श्री. सं. ज. रामबोले	दि.३१.०७.२०१९ पर्यंत

अ.क्र.	पदाचे नांव	अधिकाऱ्याचे नांव	कालावधी
४१.	सहा.ग्रंथपाल	श्री. दि. के. डोंगरे	दि.३१.०७.२०१९ पर्यंत
	(ज्ञानस्त्रोत केंद्र)	श्री. वि. द. बापते	
४२.	संचालक	डॉ. अ. मु. असनारे	
	(क्रीडा व शा.शि.)		
४३.	माहिती शास्त्रज्ञ	श्री. रा. भ.जावळे	
४४.	विद्यापीठ उपअभियंता (विद्युत)	श्री. रा. शि. एडले	
४५.	जनसंपर्क अधिकारी	डॉ. वि. रा. नांदुरकर	
४६.	सुरक्षा अधिकारी	श्री. र. जा. सयाम	अतिरिक्त कार्यभार
४७.	आरोग्य अधिकारी	डॉ. कु. स्मि. म. थोरात	

२०) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नियमित कर्मचारी वर्ग

१)	शिक्षक पदे	शासनमान्य पदे	विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे	एकूण
	प्राध्यापक	१७	—	१७
	सह. प्राध्यापक	२९	२ *	३१
	सहा. प्राध्यापक	६५	२ *	६७
	संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र	१	-	१
	संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार	१	-	१
	सहा. ग्रंथपाल	२	-	२
	संचालक, शारीरिक शिक्षण	१	-	१
	संचालक, (मानव संसाधन विकास केंद्र)	-	१*	१
	प्रमुख, संगणक केंद्र	१	-	१
	यंत्रणा विश्लेषक	२	-	२
	माहिती शास्त्रज्ञ	१	-	१
		१२० + ७ @	५*	१२५ + ७ @

* विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत मंजूर पदे.

@ ही पदे 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' साठी एकत्रित वेतनावर खालीलप्रमाणे मंजूर आहे.

२)	**शिक्षकेतर पदे**	**शासनमान्य पदे**	**विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे**	**एकूण**
	प्रथम श्रेणी	४०	—	४०
	द्वितीय श्रेणी	२९	(* १ + १ #) २	३१
	तृतीय श्रेणी	२६० + ६ (भूतसंवर्गात मंजूर)	(* ४ + १ #) ५	२७१
	चतुर्थ श्रेणी	१५२	(* २ + १ #) ३	१५५
		४८७ + २ @	**(* ७ + ३ #) १०**	**४९७ + २ @**

***** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत योजना कालावधीतील पदे.

@ 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' येथे एकत्रित वेतनावरील पदे

शिक्षकेतर संवर्गात : सहायक - १ व शिपाई - १ (एकूण २)

'वुमेन्स स्टडीज सेंटर साठी एकत्रित वेतनावरील पदे

शिक्षकेतर संवर्गात : प्रोजेक्ट असिस्टंट -१ व शिपाई - १ (एकूण ३)
ऑफिस असिस्टंट - १

****

प्रकरण दुसरे

छत्तिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २० डिसेंबर, २०१९

विद्यापीठाचा छत्तिसावा दीक्षांत समारंभ दि. २० डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे मा. कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या दीक्षांत समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून भारत सरकारच्या मानव संसाधन विकास, दूरसंचार इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे मा. राज्यमंत्री ना.श्री संजय धोत्रे ह्यांनी उपस्थित राहून दीक्षांत भाषण दिले. मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी यावेळी स्वागतपर व प्रास्ताविक भाषण केले. याप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता व्यासपीठावर उपस्थित होते. या दीक्षांत समारंभाला माजी कुलगुरू, प्र.कुलगुरू, माजी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, प्राधिकरणांचे सदस्य, त्याचप्रमाणे दानदाते, शासकीय अधिकारी, आचार्य पदवीधारक, गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१. दीक्षांत समारंभातील पदवीकांक्षींची संख्या :

(एकूण पदवीकांक्षीची संख्या स्तंभ ३ व प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणाऱ्यांची संख्या स्तंभ ४ मध्ये दिली आहे.)

अ.क्र.	पदवीचे नांव	पदवीकांक्षीची संख्या	प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणाऱ्यांची संख्या
१	२	३	४
१	वाङ्मय पारंगत	२०६१	निदेश क्रमांक २/ १५, दिनांक- २०.१०.२०१५ अन्वये ३४ व्या दीक्षांत समारंभापासून आचार्य पदवी धारक वगळून उर्वरित पदवीधारकांना महाविद्यालयीन स्तरावर संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त होईल.
२	वाङ्मय स्नातक	८५२८	
३	प्रादर्शिक कला स्नातक	०५	
४	समाजकार्य पारंगत	४३९	
५	समाजकार्य स्नातक	६६४	
६	ग्रंथालय शास्त्र पारंगत	४०	
७	ग्रंथालय शास्त्र स्नातक	६०	
८	पत्रकारिता पारंगत	३९	
९	पत्रकारिता स्नातक	५१	
१०	वाङ्मय स्नातक समाजकार्य	१९	
११	बी.एफ.ए.	–	
१२	तत्त्वज्ञान पारंगत (कला व समाजशास्त्र)	३८	
१३	वाणिज्य पारंगत	१०१	
१४	वाणिज्य स्नातक	७२१०	

१	२	३	४
१५	व्यवसाय प्रशासन पारंगत	४१३	
१६	व्यवसाय प्राशासन स्नातक	१६१	
१७	औद्योगिक संबंध आणि कार्मिक प्रशासन पारंगत	२३	
१८	एम.सी.एम.	४१	
१९	तत्त्वज्ञान पारंगत (वाणिज्य)	३०	
२०	पदव्युत्तर पदविका बायो-डायव्हर्सिटी	०४	
२१	विज्ञान पारंगत	१७१८	
२२	विज्ञान स्नातक	६४५८	
२३	संगणकशास्त्र स्नातक	७३४	
२४	पदव्युत्तर पदविका (कौन्सलिंग व सायकोथेरपी)	०६	
२५	गृहविज्ञान पारंगत	२६	
२६	गृहविज्ञान स्नातक	११०	
२७	फॅशन डिझायनिंग स्नातक	५१	
२८	सौंदर्य प्रसाधने पारंगत	३६	
२९	सौंदर्य प्रसाधने स्नातक	९६	
३०	शिक्षण पारंगत	२८	
३१	शिक्षण स्नातक	१६०७	
३२	शारीरिक शिक्षण पारंगत	३९	
३३	शारीरिक शिक्षण स्नातक (एक वर्षीय)	४१०	
३४	शारीरिक शिक्षण स्नातक (तीन वर्षीय)	१०८	
३५	पदव्युत्तर पदविका इन योगा थेरपी	२७	
३६	विधी पारंगत	१३७	
३७	विधी स्नातक	३१३	
३८	बी.ए. इन लॉ	१२९	
३९	पदव्युत्तर पदविका इन मानव अधिकार	०५	
४०	पदव्युत्तर पदविका इन टॅक्सेशन	०१	
४१	पदव्युत्तर पदविका इन सायबर लॉ	२१	
४२	भेषजी पारंगत	१३४	

१	२	३	४
४३	भेषजी स्नातक	५८८	
४४	अभियांत्रिकी पारंगत/एम.टेक	२१७	
४५	विज्ञान पारंगत (उपयोजित परमाणू)	२५	
४६	संगणकशास्त्र पदव्युत्तर पदविका	०७	
४७	अभियांत्रिकी स्नातक	७१४६	
४८	अभियांत्रिकी स्नातक (पार्ट टाईम)	०१	
४९	तांत्रिकी स्नातक (सर्व)	५४	
५०	वस्त्रोद्योग स्नातक	४७	
५१	वास्तुशास्त्र स्नातक	९५	
५२	एम.सी.ए.	१७२	अ.क्र. ५३ ते ६१ वरील सर्व आचार्य पदवीधारक दीक्षांत समारंभासाठी उपस्थित होते.
५३	अभियांत्रिकी आचार्य	९१	
५४	वाङ्मय आचार्य	६९	
५५	समाजकार्य आचार्य	१००	
५६	विज्ञान आचार्य	१२८	
५७	गृहविज्ञान आचार्य	०२	
५८	शिक्षण आचार्य	२३	
५९	शारीरिक शिक्षण आचार्य	१४	
६०	विधी आचार्य	०३	
६१	भेषजी आचार्य	०५	
६२	वाणिज्य आचार्य	६०	

२) छत्तिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २० डिसेंबर, २०१९

मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे

प्रास्ताविकपर भाषण

नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे राज्यपाल व मा. कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी, प्रमुख अतिथी मा. खासदार श्री. संजय धोत्रे, समारंभास उपस्थित पूर्व-कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो...

विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो आणि आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेल्या प्रमुख अतिथींचा परिचय करून देण्याचे भाग्य लाभले, याबद्दल प्रथम आनंद व्यक्त करतो.

आज दीक्षांत समारंभासाठी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारी हे अध्यक्ष म्हणून लाभलेले आहेत. दि. १७ जून १९४२ साली जन्मलेल्या श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी अल्मोडा महाविद्यालयातून एम. ए. (इंग्रजी) ही पदवी संपादन केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी उत्तरप्रदेशातील एटा येथे अध्यापनाचे कार्य केले. महाविद्यालयीन जीवनातूनच त्यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी संघटनेचे ते महासचिव म्हणून निवडून आले होते. १९९७मध्ये उत्तरप्रदेश राज्याच्या विधान परिषदेवर ते आमदार म्हणून निवडून गेले. उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर ते तेथील राजकारणातील एक प्रमुख लोकनेते राहिले आहेत. उत्तराखंड राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळामध्ये त्यांनी ऊर्जा, पाटबंधारे, जलसिंचन, न्याय व विधिमंडळ कामकाज मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. सन २००१मध्ये ते उत्तराखंड राज्याचे मुख्यमंत्री झाले. २००२ ते २००७ या कालावधीत ते उत्तराखंड विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००८मध्ये ते राज्यसभेवर तर २०१४मध्ये नैनिताल-उधमसिंगनगर या लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी त्यांची महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. महामहीम राज्यपाल यांनी राजकीय प्रवासात, सामाजिक-शैक्षणिक सेवेलाच अधिक महत्त्व दिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून लहानपणापासूनच ते सामाजिक जीवनात सक्रिय होते. उत्तराखंड राज्यातील टिहरी धरण प्रकल्पग्रस्त लोकांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. उत्तराखंड राज्यात अनेक शाळा-महाविद्यालयांची स्थापना केली. 'पर्वत पियुष' या साप्ताहिकाचे ते संस्थापक संपादक राहिले आहेत. 'उत्तरांचल प्रदेश क्यो?', 'उत्तरांचल : संघर्ष एवं समाधान' ही त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. सामाजिक जीवनासाठी राजकारणाचा वसा घेतलेले प्रमुख अतिथी सन्माननीय महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारी यांचे आजच्या दीक्षांत समारंभात मी स्वागत करतो. त्यांची उपस्थिती आम्हा सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

आजच्या समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी म्हणजे मा. खासदार श्री. संजय धोत्रे. श्री. संजय धोत्रे हे विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. विद्यापीठाचा एक माजी विद्यार्थी शिक्षणाशी संबंधित खात्याचा मंत्री होतो, याविषयी

पहिली रांग - (डावीकडून उजवीकडे) डॉ. एफ.सी. रघुवंशी, डॉ.श्रीमती मीनल ठाकरे (भोंडे), श्री. व्ही. व्ही. घुईखेडकर, प्रा. दिनेश सुर्यवंशी, मा. केंद्रीय मानव संसाधन व विकास राज्यमंत्री ना. श्री. संजय धोत्रे , प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल तथा कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, मा. प्र- कुलगुरु डॉ.राजेश जयपूरकर , डॉ. प्रदीप डी.खेडकर, डॉ.अरुण डी.चौहान, डॉ.अविनाश मोहरील.

दुसरी रांग - (डावीकडून उजवीकडे) डॉ.संजय व्ही.डुडुल, डॉ.एच.आर.देशमुख, डॉ.सौ.मनिषा पी. काळे, डॉ.सौ.अरुणा पाटील, श्री उत्पल आर.टोंगो, श्री सुनिल डब्ल्यू.मानकर, डॉ.प्रफुल्ल यु.गवई, डॉ.डी.डब्ल्यू.निचित, कुलसचिव डॉ.तुषार देशमुख, डॉ.बी.डी.कऱ्हाड.

विद्यादंडधारक - श्री.शरद डुकरे,श्री.रामभाऊ बुगल.

प्रथमतः मी आनंद व्यक्त करतो आणि त्यांचे स्वागत करण्याची संधी मला लाभली, हे माझे सद्‌भाग्य समजतो. मा. श्री. संजय धोत्रे हे अकोला लोकसभा मतदारसंघातून चौथ्यांदा लोकसभेवर निवडून आलेले खासदार असून सध्या भारत सरकारच्या मानव संसाधन विकास, दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि विधी या विषयांमध्ये पदवी प्राप्त केली आहे. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांनी ग्रामीण विकासासाठी कार्य केले असून केंद्र पातळीवर ग्रामीण विकास, कृषी, रेल्वे, सूचना व प्रसारण इत्यादी स्थायी समितीत सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. ग्रामीण विकासासाठी विदर्भाचे प्रतिनिधित्व देशपातळीवर करणाऱ्या या लोकप्रतिनिधीचे आजच्या दीक्षांत समारंभात मी सहर्ष स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. सन २००४मध्ये कर्मयोगी संत गाडगे बाबा ह्यांचे नाव या विद्यापीठाला देण्यात आले. अगदी स्थापनेपासूनच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करत, शिक्षणप्रसाराचे कार्य करणाऱ्या या विद्यापीठाशी आज ३९४ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित असून त्यांपैकी १३३ महाविद्यालयेे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २(f)/१२(B)सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरतर्फे ('नॅक'तर्फे) 'अ' श्रेणी प्राप्त करणारे आपले विद्यापीठ कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कटिबद्ध आहे. गुणवत्तेचे एक एक शिखर गाठणाऱ्या या विद्यापीठातर्फे आजच्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विद्याशाखांमधील ४८० संशोधकांना आचार्य (पीएच.डी) पदवी, विविध परीक्षांतील गुणवत्ता यादीत स्थान पटकावणाऱ्यांना ११२ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके, २४ रोख पारितोषिके तसेच ४०,६३५ विद्यार्थ्यांना पदवी व ७२ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आली.

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालये यांतून विविध शैक्षणिक कामे प्रगतिपथावर आहेत. 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना'च्या ('रुसा'च्या) माध्यमातून विद्यापीठात इमारतींचे नूतनीकरण, परिसर सौंदर्यीकरण आणि विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधून सहा संशोधनप्रकल्प राबविले जात असून या वर्षी उपयोजित परमाणू विभागातील प्राध्यापकाच्या 'लेझर मऊस नेव्हीगेशन सेन्सर सिस्टिम फॉर थिकनेस मेझरमेंट' या शोधशीर्षकासाठी तर जैवतंत्रज्ञान विभागातील प्राध्यापिकेच्या 'प्रोसेस फॉर इलिसिटेशन ऑफ ए स्ट्रेस इन्ड्यूस्ड ॲंटीमायक्रोबियल मेटॅबोलाईट इन पॅसिफ्लोरा फोएटिडा एल' या शोधशीर्षकासाठी असे एकूण दोन एकाधिकार (पेटंट) प्राप्त झालेत.

केंद्रीय मनुष्य विकास मंत्रालयाच्या 'ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क' (GIAN) या योजनेअंतर्गत विद्यापीठास तीन आंतरराष्ट्रीय अल्पावधी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्याची संधी प्राप्त झाली. जैवतंत्रज्ञान विभागाने 'बेसिक इम्युनिओलॉजी ॲंड इम्युनोथेरपी' तसेच 'एव्हीडन्स बेस्ड मेडिसीन : प्रिन्सिपल्य ॲंड प्रॅक्टिसेस' या विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रम तर भूगर्भशास्त्र विभागाने आय. आय. टी. खरगपूर यांच्या माध्यमातून 'हिस्ट्री ऑफ लाईफ ॲंड मास एक्स्टिंक्शन इव्हेंटस' या विषयावरील प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. भूगर्भशास्त्र अभ्यासक्रमासाठी तज्ज्ञ म्हणून स्वित्झरलॅंड येथील टॅरी एडीटी यांना आमंत्रित करण्यात आले होते. जुलै २०१९मध्ये भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या सहकार्याने RESPOND या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत ६ स्टार्ट अपची नोंदणी झालेली आहे. मानव संसाधन विकास मंत्रालय, इनोव्हेशन सेल, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून विद्यापीठास इन्स्टिट्यूट इनोव्हेशन सेल (आय.आय.सी.) स्थापन करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. या वर्षी मार्च २०१९ आणि सप्टेंबर २०१९मध्ये स्टार्ट अप स्पर्धांमधून संशोधक विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील नावीन्यपूर्ण

मॉडेल्स सादर केलेत. इन्क्युबेशन सेंटरला अत्यावश्यक असणाऱ्या सेक्शन ८ अंतर्गत कंपनीची स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून स्टार्ट अप क्रियान्वयनासाठी महाराष्ट्र शासनाकडून विद्यापीठास पाच कोटींचे अनुदान अपेक्षित आहे. त्यापैकी या वर्षी पंचवीस लक्ष रुपये प्राप्त झालेले आहेत.

नॅक, बेंगलूरू यांच्या माध्यमातून विद्यापीठ आय.क्यू.ए.सी.ने 'असेसर्स ओरियंटेशन प्रोग्रॅम'चे यशस्वीपणे आयोजन केले. या उद्‌बोधन वर्गासाठी देशभरातून ५४ व्यक्तींनी सहभाग घेतला. तसेच विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांपैकी प्राणिशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग, गणित विभाग यांनी राष्ट्रीय चर्चासत्र-परिषदांचे आयोजन केले.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांविषयी आदर व अभिमान व्यक्त करण्यासाठी विद्यापीठाने या वर्षीदेखील 'मराठी भाषा गौरव दिना'चे भव्य प्रमाणात आयोजन केले. प्रसंगी विद्यापीठाच्या इंद्रधनुष्य स्पर्धेतील सहभागी चमूने, मराठमोळ्या कला-संस्कृतीचा आविष्कार करणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दि. ५ व ६ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, सांस्कृतिकी, भुवनेश्वर आणि कलाशिखर फाऊंडेशन, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात १३८ नर्तक कलाकारांच्या एकूण ३२ चमूंनी कथ्थक, भरतनाट्यम, ओडिसी, कुचिपुडी, छऊ, लावणी, कोळीनृत्य, गोंधळ व तुरथाल इत्यादी नृत्यशैलींचे सादरीकरण केले. या महोत्सवात रशिया येथील ४ शास्त्रीय नृत्यांगनांचा सहभाग राहिला, हे विशेष.

विद्यापीठाच्या 'नॅशनल रिसोर्स सेंटर'च्या माध्यमातून या वर्षी ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच 'व्हर्च्युअल सी फोर' या उपक्रमाद्वारे विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा समाजाला लाभ घडवून देण्यात येत आहे.

विद्यापीठाचा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थी. शिक्षणाच्या क्षेत्रात उच्च गुणवत्ता संपादन करणारे विद्यार्थी इतर क्षेत्रांतूनही गुणवत्ता सिद्ध करीत आहेत. अभ्यासाबरोबरच संशोधनक्षेत्रातही विद्यार्थी प्रगती करीत आहेत. १३व्या 'आविष्कार' स्पर्धेत मेडिसिन आणि फार्मसी या गटात विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यास प्रथम स्थान तसेच राष्ट्रीय पातळीवरील 'अन्वेषण' स्पर्धेत सामाजिकविज्ञान वर्गवारीत दुसरे व आरोग्यविज्ञान वर्गवारीत तिसरे पारितोषिक पटकावले.

सप्टेंबर २०१९मध्ये, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नोव्हेंबर २०१९मध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत विद्यापीठ चमूने तृतीय स्थान प्राप्त केले.

क्रीडा स्पर्धांमध्येदेखील विद्यापीठ चमूंनी उत्तम कामगिरी बजावली. सत्र २०१८-२०१९मध्ये इटलीमधील नेपोली येथे संपन्न झालेल्या विश्व आंतर विद्यापीठ धनुर्विद्या (पुरुष) स्पर्धेत विद्यापीठाच्या खेळाडूने सहभाग नोंदविला. २०१९मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत बॉक्सिंग (पुरुष) प्रकारात द्वितीय स्थान, धनुर्विद्या (पुरुष व महिला) प्रकारांत इंडियन ५० मीटर राऊंड प्रत्येकी एक सुवर्णपदक, इंडियन ३० मीटर वैयक्तिक ऑलंपिक राऊंड सुवर्णपदक, कंपाउंड राउंड ५०-२ मीटर सुवर्णपदक, रिकव्हर ७० मीटर-१ सुवर्णपदक, रिकव्हर टीम राऊंड रौप्यपदक तसेच फेब्रुवारी २०१९मध्ये मुंबई येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात १०० मीटर, लांब उडी, या मैदानी स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी प्रथम स्थान पटकावले. दि. ५ ते ९ डिसेंबर २०१९ या कालावधीत विद्यापीठाने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत पाच राज्यांतून ६१ विद्यापीठांच्या ७२० खेळाडूंनी सहभाग घेऊन दमदार कामगिरीचे प्रदर्शन केले.

सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी विद्यापीठातर्फे उपयोजित कौशल्य विकास वर्गांचे आयोजन करण्यात आले. बांबू कल्चरला चालना देण्यासाठी बांबू व हस्तकला केंद्राच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन, अध्यापन या बाबींकडे लक्ष पुरविणाऱ्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांची तरतूद केली आहे. विविध योजनांमधून ३८५ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेत ३८३ महाविद्यालये आणि २९ पदव्युत्तर विभागांतील एकूण २,०१,०३४ विद्यार्थ्यांचा सुरक्षा विमा काढण्यात आला आहे. तसेच कौशल्य विकास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ४५०० विद्यार्थ्यांनी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. अंदाजे ८००० विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे निःशुल्क प्रशिक्षण देण्याची योजना असून, त्यासाठी विद्यापीठाने आठ लक्ष रुपये एवढ्या निधीची तरतूद केलेली आहे. याशिवाय विद्यापीठाच्या 'ट्रेन द ट्रेनर' उपक्रमातून ९१ प्राध्यापकांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे प्राध्यापक विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी ट्रेनर म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून, स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, महिला सक्षमीकरण कार्यशाळा, आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण शिबिर, उन्नत भारत अभियान कार्यशाळा, आदिवासी कुमारी माता कार्यशाळा, जागतिक एड्स- प्रतिबंध व नियंत्रण रॅली, युवा प्रशिक्षण शिबिर इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांपैकी यवतमाळ येथील सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय आणि मूर्तिजापूर येथील श्री गाडगे महाराज महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सेवाकार्य केले. संकटकाळी देशबांधवांच्या मदतीला धावून जाणाचे सामाजिक भान दाखविणाऱ्या संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. सामाजिक बांधिलकीचा पुरस्कार करत विद्यापीठाने झरी झामणी येथे कुमारी मातेच्या प्रश्नाविषयी जाणीवजागृती केली. या प्रश्नावर संशोधन प्रकल्प राबविला. तेथे महिलांसाठी आरोग्य समुपदेशन आणि आरोग्य चिकित्सा वर्ग तसेच लहान मुलांसाठी संस्कार वर्ग यांचे आयोजन केले. यासाठी ११ महाविद्यालयांचे सहकार्य लाभले.

केंद्र शासनाच्या उन्नत भारत अभियानांतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रातील दत्तक घेण्यात आलेल्या २७० गावांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने ग्रामविकासाचे कार्य सुरू आहे. विद्यापीठाच्या उन्नत भारत अभियान केंद्रास आता विभागीय समन्वय संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे.

विद्यापीठाने पर्यावरणपूरक जीवनाचा पुरस्कार करण्यासाठी, हिंगणघाट येथील पी. व्ही. टेक्सटाईल यांच्या सी.एस.आर. निधीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तीन लक्ष रुपयांतून, विद्यार्थ्यांसाठी साायकल सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यातून वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या सुविधेसाठी विद्यापीठ परिसरात ४० सायकली उपलब्ध करून दिल्या जातील. या वर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात बकुळ प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली तसेच वनमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील 'पर्यावरण पुरस्कार' तसेच 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार' विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात आलेत.

विद्यापीठाच्या 'ज्ञानस्रोत केंद्रा'द्वारे या वर्षी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या व उत्तम गुणवत्ता विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पुस्तक पेढी योजना' सुरू करण्यात आली. याशिवाय, या केंद्राद्वारे महाविद्यालयांसाठी अभ्यासिका, लायब्ररी नेटवर्क, कन्सॉर्शिया सेवा इत्यादी उपक्रम राबविले जातात. 'वाचन प्रेरणा दिना'निमित्त बुक टॉक स्पर्धा आणि संशोधनपर निबंध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थी मित्रहो, उच्च शिक्षण पूर्ण करून, तुम्ही आता जीवनाच्या विविध क्षेत्रांत मार्गक्रमण करणार आहात. तेव्हा संत गाडगे बाबांच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्यांचा अंगीकार करून तुम्ही वाटचाल करावी, असे या प्रसंगी मी सांगेन. संत गाडगे बाबांचे कर्मनिष्ठेचे सूत्रच आपल्याला महान बनवेल, हे लक्षात ठेवा. आपला देश भौतिक प्रगतीची उंच शिखरं गाठत असताना सामाजिक विषमता वाढणार नाही, यासाठी आपण दक्ष राहिले पाहिजे. महिला अत्याचार, कुमारी माता, मेळघाटातील कुपोषण, शेतकरी आत्महत्या अशा प्रश्नांपासून आपण समाजाला मुक्त केले पाहिजे. आपले शिक्षण सामाजिक चळवळीसाठी फलदायी ठरले पाहिजे. विकासाची दारं सगळ्यांसाठी उघडी आहेत, असा विश्वास सगळ्या समाजघटकांना मिळाला पाहिजे. एकविसाव्या शतकात कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनावर आक्रमण करीत असताना, आपल्याला विवेकबुद्धीचा जागर अविरत सुरू ठेवावा लागणार आहे. संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' असे म्हटले होते. त्याला अनुसरून, आपण ज्ञानरूपी दीपातून जगावर प्रकाशाचा वर्षाव करावा, एवढी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि पुढील वाटचालीसाठी तुम्हाला शुभेच्छा देतो.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत. पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

धन्यवाद !

जय हिंद, जय महाराष्ट्र !

३) छत्तिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २० डिसेंबर, २०१९

प्रमुख अतिथी खासदार मा.श्री. संजय धोत्रे

मा. राज्यमंत्री, मानव संसाधन विकास, दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार यांचे दीक्षांत भाषण

नमस्कार!

सुसंस्कृत, बुद्धिवादी, विवेकनिष्ठ समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा व बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार आणि कृषिक्रांतीचे अग्रदूत भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पवित्र स्मृतीस मी सर्वप्रथम वंदन करतो.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री. भगतसिंह कोश्यारीजी, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, तसेच समारंभास उपस्थित पूर्व-कुलगुरू, विद्यमान प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो...

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या छत्तिसाव्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहण्याची संधी मला आज लाभली, याचा मला विशेष आनंद आहे.

सन १९८३मध्ये महाराष्ट्र दिनी स्थापन झालेल्या या विद्यापीठांतर्गत पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. आज रोजी सुमारे ४ लक्ष विद्यार्थी या विद्यापीठांतर्गत विद्यार्जन करीत आहेत. सन २०१०मध्ये NAACचे बी ग्रेडिंग असलेले विद्यापीठ सन २०१६ मध्ये reaccreditation नुसार A ग्रेडिंगमध्ये मोडते, ही बाब अभिनंदनीय व विद्यापीठाच्या निरंतर प्रगतीचे निदर्शक आहे.

ज्या पूजनीय संताच्या नावे विद्यापीठाचे नामाभिधान करण्यात आले आहे, त्या संत गाडगे बाबांच्या शैक्षणिक विचारांचे पाईक होणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. संत गाडगे बाबा कायम म्हणायचे की, 'कर्मकांड हे समाजास अधोगतीकडे नेते' म्हणूनच त्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोनाचा प्रसार आणि प्रचार करायला सुरुवात केली. संत गाडगे बाबांनी आपल्या दशसूत्रीमध्ये भुकेल्यांना अन्न, वस्त्र नसणाऱ्यांना वस्त्र, घर नसणाऱ्यांना घराचा निवारा, काम नसणाऱ्यांना रोजगार, मुक्या प्राण्यांना अभय इत्यादी बाबी नमूद केल्या व याच दशसूत्रीमध्ये त्यांनी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मूलमंत्र या समाजाला दिला.

दिनांक ८ नोव्हेंबर १९५३ रोजी गाडगे बाबा बांद्रा येथील आपल्या शेवटच्या कीर्तनात म्हणतात की, 'आतातरी मुलाले शिक्षण द्या, पैसे नाही म्हणाल तर जेवणाचं ताट मोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या, इवायाला पाहुनचार करू नका, पण मुलाले शाळेत घातल्याविना सोडू नका.' सन १९५२मध्ये त्यांनी 'श्री गाडगे बाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षण संस्था व धर्मशाळा स्थापन केल्या. संत गाडगे बाबांचे शिक्षणविषयक विचार सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आजही महत्त्वाचे आहेत. अशा संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत आपण आज आहोत व त्यांच्या नावाने कार्यरत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली, हे माझे भाग्यच आहे.

विद्यार्थी मित्रहो, आज तुमचा दीक्षांत समारोह आहे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून तुम्ही समाजाच्या व्यासपीठावर पदार्पण करणार आहात. आपण संपादन केलेल्या ज्ञानाच्या आधारे आपणास स्वतःच्या विकासासोबतच समाजाची जडणघडण व राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी आपले योगदान द्यावयाचे आहे. संपादित ज्ञानाचा मी मानव कल्याणासाठी उपयोग करेल, अशी दीक्षा घेऊन तुम्ही सर्वजण समाजसेवेसाठी वचनबद्ध व्हाल, असा मला विश्वास आहे.

स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही भारतात उच्च शिक्षणाचा विस्तार अजून पुरेसा झालेला नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे. १२५ कोटी लोकसंख्या असलेल्या भारत देशात विद्यापीठांची संख्या ९०० च्या आसपास आहे. प्रगत देशांच्या तुलनेत ही संख्या निश्चितच कमी आहे. भारताच्या एक चतुर्थांश लोकसंख्या असलेल्या अमेरिकेत २५००पेक्षा जास्त विद्यापीठे आहेत, तर ज्याच्याशी भारताची तुलना होते त्या चिनमध्ये २०००पेक्षा अधिक विद्यापीठे आहेत. आपणास किती मोठा पल्ला गाठायचा आहे, हे यातून स्पष्ट होते. अलीकडेच केंद्रीय मनुष्यबळ विकास विभागाने ऑल इंडिया हायर एज्युकेशन सर्व्हे (AIHES) जाहीर केला आहे. या अहवालानुसार उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (Gross Enrollment Ratio- GER) २६.३ % असल्याचे दिसून येते. नवे सहस्त्रक सुरू होत असताना हे प्रमाण १० % पेक्षा कमी असल्याने आणि त्याच सुमारास 'तरुणांच्या वाढत्या संख्येच्या लाभाची' (Demographic Dividend) चर्चा होत असल्याने चिंता व्यक्त केली जात होती. आता हे प्रमाण २५ %पर्यंत पोचले, ही बाब समाधानकारक असली तरी यामध्ये सुधारणेस मोठा वाव आहे.

सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्वक उच्च शिक्षणासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय नेहमीच प्रयत्नशील असते. याच अनुषंगाने केंद्र सरकारने 'पंडित मदन मोहन मालवीय राष्ट्रीय शिक्षक व शिक्षण मिशन' (PMMMNMTT) सुरू केले आहे. सन २०१३ पासून 'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान' (RUSA) राबविण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील विद्यापीठांना आणि सरकारी व अनुदानित महाविद्यालयांना सक्षम केले जात आहे. याद्वारे विद्यापीठ आणि सरकारी कॉलेजमधील शैक्षणिक गुणवत्ता अधिक दर्जेदार करण्यासाठी व पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी 'रुसा'ने पाठबळ दिले आहे.

अलीकडेच भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास खात्याने नवीन शैक्षणिक धोरण २०१९चा मसुदा जनतेसमोर ठेवला असून पूर्व प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत अनेक बदल यामध्ये सुचवले आहेत. इस्त्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समितीने हा मसुदा तयार केला आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या स्वायत्ततेला आणि गुणवत्तेला प्राधान्य देणे, गुणवत्तापूर्ण संशोधनाला चालना देण्यासाठी 'राष्ट्रीय संशोधन मंडळ/ संस्थे'ची स्थापना करणे, उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जागी 'राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण मंडळ' (NHERA) यंत्रणा उभारणे, सन २०३०पर्यंत उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दर्शविणारा ढोबळ नोंदणी प्रमाण निर्देशांक ५० % पर्यंत वाढविण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी बाबींचा मसुद्यामध्ये समावेश आहे.

व्यावसायिक शिक्षण हा उच्च शिक्षणाचा अविभाज्य भाग असणे ही काळाची गरज आहे. याच अनुषंगाने व्यावसायिक शिक्षणामध्ये कौशल्याधारित शिक्षणाचे पदवी आणि पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, व्यावसायिक अभ्यासक्रमातील पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन यांना चालना देणे, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविण्यासाठी उच्च गुणवत्तेचे शिक्षक निर्माण करण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यामध्ये स्वतंत्र विभाग निर्माण करणे या बाबी नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत विचाराधीन आहेत.

आज आधुनिक शेतीच्या नावाखाली व अधिक उत्पादन वाढविण्याच्या हव्यासापोटी शेतकरी रासायनिक खतांचा व अत्यंत प्रभावी अशा कीटकनाशकांचा बेसुमार वापर करीत आहे. त्यामुळे काही प्रमाणात शेतमालाचे उत्पादन वाढले असले किंवा पिकांवरील रोगांना काही प्रमाणात आळाही बसला असेल, परंतु त्यामुळे शेतीचा कस कमी होऊन जमिनीची सुपीकता मात्र कमी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरमसाठ वाढला असून त्या प्रमाणात शेतमालाचे

ना. श्री. संजय धोत्रे

मा. राज्यमंत्री, मानव संसाधन विकास, दूरसंचार,
इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे

उत्पादन होत नसल्याने शेतकऱ्यांचा फारसा आर्थिक विकास होऊ शकलेला नाही. भारतामध्ये पूर्वी नैसर्गिक शेती करण्यात येत होती, त्याद्वारे जमिनीचा पोत टिकवून ठेवून शेतकरी उत्पादन घेत होता व त्याआधारे सुखी व संपन्न जीवन जगत होता. मी तर म्हणेन की आज पुनः आम्हाला पूर्वीप्रमाणेच नैसर्गिक शेतीकडे वळणे गरजेचे झाले आहे. मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये नैसर्गिक शेतीस वाव देऊन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून निव्वळ उत्पन्न वाढविणे यावर भर देण्यात आला आहे.

आज विज्ञान-तंत्रज्ञान-उद्योग यांत नवकल्पनांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. इनोव्हेशन-इन्क्युबेशन हे कळीचे शब्द झालेले आहेत. इनोव्हेशन उपक्रम आज आपल्याला राबवावे लागतात. ते पूर्वी जीवनात अंतर्भूत होतेच. ग्रामीण जीवनातील कल्पकतेतून विद्यार्थ्यांनी नवकल्पनांबाबत प्रेरणा घ्यायला हवी. आज स्टार्टअप कल्चर आलेले आहे. नोकरीच्या मागे न लागता विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे उद्योग सुरू करावेत यासाठी केंद्र शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता विद्यापीठांच्या माध्यमातून स्टार्टअपसाठी चालना देण्यात येते. माझ्या मते, ही सध्याचा काळातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेली चांगली संधी आहे. नवकल्पनांवर आधारित उद्योग-व्यवसाय यांत पुढे जाण्यासाठी विद्यार्थिदशेतच काही मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळत असेल, तर बेरोजगारीची समस्या सुटण्यास निश्चितच हातभार लागू शकेल. आपण कष्ट करण्यास प्राधान्य दिले पाहिजे तसेच कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. कुशल मनुष्यबळाची या देशाला खूप आवश्यकता आहे. मात्र आवश्यकतेप्रमाणे कुशल विद्यार्थी मिळत नाहीत, ही उद्योगजगताची ओरड आहे. छोट्या-मोठ्या कौशल्यांची आवश्यकता तर दैनंदिन जीवनात विविध क्षेत्रांत पदोपदी भासते. सूत्रसंचालन करणारे, अहवाललेखन करणारे, वृत्तलेखन करणारे, डीटीपी करणारे, साध्या साध्या ब्लडशुगर टेस्ट यांपासून तर वेगवेगळ्या प्रकारच्या क्वालिटी कंट्रोल टेस्ट, चाचण्या करणारे-गुणवत्ता तपासणारे, दुभाषी, भाषांतरकार, स्टेनोग्राफर, छोटे-मोठे तंत्रज्ञ, उत्तम शिक्षक-अध्यापक एक नव्हे अनेक कौशल्यांची व ती आत्मसात केलेल्या व्यक्तींची समाजाला गरज आहे. ती आवश्यकता पूर्ण करणाऱ्यांना निश्चितच रोजगार उपलब्ध होऊ शकतो. स्टार्टअप क्षेत्र विशेष नावीन्यपूर्ण दृष्टीला प्रोत्साहन देण्यासाठी व उद्योग उभे करण्यासाठी पुढे येत आहे. आज देशात अनेक तरुण एकत्र येऊन नवीन उद्योग कल्पना अमलात आणत आहेत. स्वावलंबी बनवण्यासाठी आपण स्टार्टअपचा अवलंब करावा, असे मी सांगेन. देश उद्योग-व्यवसायांतून पुढे न्यायचा असेल तर स्टार्टअपशिवाय पर्याय नाही. स्टार्ट अपद्वारे आपल्या नवीन क्षमतांना पूर्णपणे वाव मिळेल, असा मला विश्वास वाटतो.

याशिवाय आपण विविध प्रकारच्या प्रक्रिया उद्योगांकडे लक्ष पुरवायला हवे. प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणावर वाव आहे. यातून रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. आज नवनवीन क्षेत्र उदयाला येत आहेत. काही क्षेत्र नव्याने प्रतिष्ठित झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, जेनेटिक इंजिनिअरिंग यांच्यापासून तर डिजिटल वित्तीय व्यवस्था, दृकश्राव्य माध्यमे, दूरसंचार तंत्रज्ञान-माहिती संपादन, माहिती विश्लेषण (डेटा ॲनालिसिस) इत्यादी क्षेत्रांतून घडणाऱ्या बदलांकडे आपण लक्ष द्यायला पाहिजे. या क्षेत्रांतून नवनवीन संधी उपलब्ध होऊ शकतील.

विद्यार्थी मित्रहो, दिवसेंदिवस जमिनीतील पाण्याची पातळी अधिकाधिक खोल जात आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होत आहे. बेसुमार वृक्षतोड होत असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. जमिनीची उत्पादकता घटत आहे. औद्योगिकीकरण व वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाल्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत आहे. तसेच ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्येमुळे संपूर्ण जीवसृष्टीसमोर संकट निर्माण झाले आहे. एकदा वापरात येणाऱ्या प्लॅस्टिकचा अतिवापर तसेच घनकचरा व इलेक्ट्रॉनिक कचरा व्यवस्थापनासंदर्भातील भीषण समस्या आपल्यासमोर आ वासून उभ्या आहेत. या समस्यांवर तुम्ही घेतलेल्या ज्ञानाच्या आधारे उपाय शोधण्याची तुम्हा तरुण पिढीची जबाबदारी आहे. संपूर्ण सजीव सृष्टीला समृद्ध करणाऱ्या नैसर्गिक स्रोतांचे जतन करून व संवर्धन करून येणाऱ्या पिढ्यांना शुद्ध हवा, शुद्ध पाणी

व समतोल पर्यावरण उपलब्ध करून देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तुम्ही सर्वजण पदवीधर म्हणून येथून बाहेर पडत आहात. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात गेलात तर त्या ठिकाणी या अनुषंगाने आपण आपले योगदान द्यावे, असे मी आवाहन करतो.

काळानुसार जीवनाचे प्रश्न बदलत जातात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वेगवेगळ्या प्रश्नांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष जायला हवे. स्थानिक आणि जागतिक प्रश्नांचे आपल्याला भान यायला हवे. त्याकडे एक चळवळ म्हणून पहायला हवे. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणाऱ्या आजच्या काळात, महिला सक्षमीकरणावर भर देतानाच, महिलांवरील अत्याचार, बलात्कार यांसारख्या घटना घडणार नाहीत, यासाठी काळजी घ्यायला हवी. महिलांचा सन्मान हीच माणुसकी असे मूल्य आपण प्रस्थापित केले पाहिजे. संतवाङ्मय, प्रबोधन परंपरा यांच्या माध्यमातून समाजात मूल्यसंस्कार टिकविला पाहिजे. संत गाडगे बाबा, तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनपरंपरेशी विद्यार्थ्यांनी आपले नाते टिकवून ठेवायला हवे.

विद्यार्थी मित्रहो, जीवनात मार्गक्रमण करताना अनेक अडचणी मार्गात येतील. त्याला तोंड द्या. अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितेतील ओळींप्रमाणे,

'बाधाएं आंती हैं आएं
घिरें प्रलय की घोर घटाएं,
पावों के नीचे अंगारे,
सिर पे बरसें यदि ज्वालाएं,
निज हाथों में हंसते-हंसते,
आग लगाकर जलना होगा ।
कदम मिलाकर चलना होगा।'

हिंमतीने जीवनातील अडथळ्यांचा-संकटांचा सामना करा. यशस्वी व्हा. आकाशात उंच भरारी घ्या. त्यासाठी तुम्हाला शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

जय हिंद! जय भारत!

4) Ph.D. Awarded during the Annual Report Year 2019-2020

Sr. No.	Faculty	Subject	Number of Research Work Completed.
1.	2.	3.	4.
1.	Humanities	Marathi	15
		English	27
		Hindi	05
		Sanskrit	03
		Urdu	02
		Music	03
		Sociology	09
		Political Science	07
		History	15
		Economics	11
		Geography	10
		Home Economics	06
		Psychology	08
		philosophy	01
		Law	01
2.	Science & Technology	Chemistry	30
		Physics	10
		Botany	16
		Biotechnology	02
		Microbiology	03
		Environmental Science	02
		Zoology	17
		Biochemistry	03
		Mathematics	05
		Electronics	02
		Geology	01
		Computer Science	01
		Pharmaceutical Sciences	05
		Electrical Engg.	04

1.	2.	3.	4.
		Civil Engg.	04
		Computer Science & Engg.	22
		Electronics & Telecommunication Engg.	14
		Production Engg.	04
		Mechanical Engg.	06
		Chemical Technology	02
		Information Technology	01
		Textile Engg.	02
3.	Commerce & Management	Commerce	33
		Business Management	05
		Business Economics	05
		Account & Statistics	01
4.	Inter-disciplinary Studies	Education	08
		Physical Education	11
		Library & Information Science	10
		Socail Work	03
		Mass Communication & Journalism	01
		Food Science & Nutrition	03
		Home-Science	01

५) दीक्षांत समारंभात कुलसचिवांनी घोषित केलेली प्राप्त देणग्यांची सूची

अ.क्र.	देणगी देणाऱ्याचे नांव	देणगीचे स्वरूप	देणगीचे नांव	परीक्षा/ उद्देश	देणगीची रक्कम
१	२	३	४	५	६
१.	डॉ. बि. जी. खोब्रागडे, अमरावती	व्याख्यानमाला	स्व. श्री गोविंदाजी खोब्रागडे स्मृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला	व्याख्यानमाला	१,००,०००.०० (अतिरिक्त)
२.	श्री डी. एन. मेटकर, काँग्रेसनगर, अमरावती	सामाजिक कार्य पुरस्कार	स्व. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृती संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार	सामाजिक कार्य पुरस्कार	१,००,०००.०० (अतिरिक्त)

६) पदके/पारितोषिके

दीक्षांत सभारंभात विद्यार्थी/विद्यार्थिनींना विविध अभ्यासक्रमात स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल प्रदान करण्यात आलेली विद्याशाखानिहाय पदके/पारितोषिके.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव व महाविद्यालय	पदक/पारितोषिकाचे नाव	पात्रता परीक्षा	गुणानुक्रम
१	२	३	४	५
	कला विद्याशाखा			
१.	कु. काजल किरण वर्मा, लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ	डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण पदक	वाङ्मय स्नातक	प्रथम
२.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	श्रीमती शांताबाई शंकरराव लोंढे सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम
३.	कु. नेहा नारायणराव भुतकर, पदव्युत्तर इंग्रजी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	प्राचार्य मफतलाल वाडीलाल नाईक सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (इंग्रजी)	प्रथम
४.	कु. नेहा नारायणराव भुतकर, पदव्युत्तर इंग्रजी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	टागोर सेमीनार १९८८ स्मृती सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (इंग्रजी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
५.	श्री पार्थ संपत शर्मा, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	कै.न्यायमूर्ती पंजाबराव भगवंतराव ठाकरे स्मृती सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (भारतीय संगीत)	प्रथम

१	२	३	४	५
६.	कु. निकिता किसन गावंडे, मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मूर्तिजापूर जि. अकोला.	स्व.सुखदेवराव शिवाजी सरकटे सुवर्णपदक	वाङ्मय स्नातक (पाली)	प्रथम
७.	कु. जान्हवी शांतनुराव म्हस्के, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.	प्रा.के.भास्कर नायर स्मृती रोख पारितोषिक रू. १,०००/-	वाङ्मय स्नातक (इंग्रजी वाङ्मय)	प्रथम श्रेणीसह प्रथम
८.	कु. दीपाली दिलीपराव गेडाम श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.	स्व.सौ.निला मुकुंद शुक्ला स्मृती सुवर्ण पदक	वाङ्मय स्नातक (संस्कृत साहित्य)	प्रथम
९.	श्री अभिनंदन प्रवीण अजमिरे, बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ.	श्री यादवराव केशवराव अंधारे स्मृती रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङ्मय स्नातक (भारतीय संगीत)	प्रथम
१०.	श्री अभिनंदन प्रवीण अजमिरे, बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ.	स्व. प्रभाकरराव नवसाळकर रौप्य पदक	वाङ्मय स्नातक (संगीत)	प्रथम
११.	श्री सुरज तुकाराम घोपे, जी.एस. सायन्स, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव जि. बुलढाणा.	गुरुनारायण सुवर्ण पदक	वाङ्मय स्नातक (संस्कृत)	प्रथम
१२.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम

१	२	३	४	५
१३.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	डॉ.व्ही.बी.उपाख्य भाऊसाहेब कोलते सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
१४.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	श्री श्रीराम नामदेवराव शेळके सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
१५.	कु. दीपाली दिलीपराव गेडाम श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.	लोकनायक माधव श्रीहरी उपाख्य बापुजी अणे सुवर्णपदक	वाङ्मय स्नातक (संस्कृत साहित्य)	प्रथम
१६.	श्री सुरज अशोक मेश्राम, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.	स्व.श्रीमती सरस्वतीबाई आनंदराव राऊत सुवर्णपदक	वाङ्मय स्नातक (मराठी वाङ्मय)	प्रथम
१७.	श्री सुरज अशोक मेश्राम, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.	स्व.श्रीमती यमुनाबाई गोडबोले रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङ्मय स्नातक (मराठी वाङ्मय)	प्रथम
१८.	श्री सुरज अशोक मेश्राम, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.	श्री भालचंद्र दामोदर बापट रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङ्मय स्नातक (मराठी वाङ्मय)	प्रथम
१९.	श्री सुरज अशोक मेश्राम, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि. यवतमाळ.	श्री विनायकराव शंकरराव हुड रौप्य पदक	वाङ्मय स्नातक (मराठी वाङ्मय)	प्रथम

१	२	३	४	५
२०.	कु. प्राजक्ता विनोद अंभोरे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हिन्दी अकादमी रोख पारितोषिक रू.१,९००/-	वाङ्मय पारंगत (हिन्दी)	प्रथम
२१.	कु. जान्हवी शांतनुराव म्हस्के. श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.	वीर उत्तमराव मोहिते स्मृती सुवर्णपदक	वाङ्मय स्नातक (इंग्रजी वाङ्मय)	प्रथम
२२.	कु. तबिन्दा फिरदौस मोहम्मद जुबेर, (बहिःशाल), अकोला.	बेरार मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्स सुवर्णपदक	वाङ्मय स्नातक (उर्दू)	प्रथम
२३.	कु. काजल किरण वर्मा, एल.बि. अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ.	पंडित देवीदासपंत के. काळे गुरुजी रोख पारितोषिक रू.१,६२५/-	वाङ्मय स्नातक (भारतीय संगीत)	विद्यार्थिनींमधून प्रथम
२४.	श्री अभिजीत अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	कविश्रेष्ठ सुरेश भट रोख पारितोषिक रू.१,६२५/-	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम
२५.	कु. पूजा शालिग्राम महेशकर, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.	श्री दत्तात्रय शिखर संस्थान माहूर सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (संस्कृत)	प्रथम श्रेणीसह प्रथम
२६.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	साहित्यिक स्व.श्री दिनकर विष्णू जोशी स्मृती सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	गुणवत्ता यादीत प्रथम

१	२	३	४	५
२७.	कु. अमृता मुकुंदराव पिंपळे, कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा,	सौ. इंदिरा राधेश्याम गणेडीवाल रोख पारितोषिक रु. ३५००/-	वाङ्मय स्नातक	गुणवत्ता यादीत द्वितीय
२८.	श्री अभिजित अशोक इंगळे, पदव्युत्तर मराठी मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	प्राचार्य श्रीहरी गायकवाड स्मृती सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (मराठी)	प्रथम
२९.	कु. चैताली दिलीपराव टाकळे, श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	प्रा.हेमंत देसाई रौप्यपदक	वाङ्मय पारंगत (इंग्रजी)	द्वितीय
३०.	कु. शिल्पा बाळकृष्ण पाटील, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती.	श्री लक्ष्मणराव उंदराजी पर्वतकर, सुवर्णपदक	वाङ्मय पारंगत (पाली व पाकृत)	गुणवत्ता यादीत प्रथम
		विज्ञान विद्याशाखा		
३१.	कु. वेदश्री किसनराव गुजर, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी.	रोटरी क्लब ऑफ अमरावती रौप्य महोत्सवी सुवर्णपदक	विज्ञान स्नातक	प्रथम
३२.	कु. वेदश्री किसनराव गुजर, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी.	स्व.सौ. इंदुताई एस.दीक्षित रौप्यपदक	विज्ञान स्नातक	विद्यार्थिनींमधून प्रथम
३३.	कु. वेदश्री किसनराव गुजर, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी.	स्व.श्रीमती चंद्रभागाबाई भाऊराव निर्मळ स्मृती रौप्यपदक	विज्ञान स्नातक	विद्यार्थिनींमधून प्रथम

१	२	३	४	५
३४.	कु. शिवानी चंद्रशेखर रोंघे, आदर्श सायन्स, जयराम भागचंद कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे.	श्रीमती तापीबाई रामचंद्र बुब (शाहदा) रौप्यपदक	विज्ञान स्नातक	द्वितिय
३५.	कु. अंकिता अनिल बेलेकर, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	स्व.प्रा.डॉ.एम.एम.म्हाला स्मृती सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र) व विज्ञान स्नातक भाग-१,२ व ३ मिळून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण	प्रथम श्रेणीसह प्रथम
३६.	कु. सानिआ तसमिम सय्यद महेमुद, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	प्रा.हरिभाऊ भाऊराव निर्मळ रोख पारितोषिक रू.९५०/-	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
३७.	कु. मयुरी राजेंद्र कथलकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	प्रा.डॉ.मनोहर आत्माराम ढोरे सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (वनस्पती शास्त्र)	प्रथम
३८.	कु. साराह खान अयुब खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.संजीव वसंत भोकरे व स्व.सौ. सारिका संजीव भोकरे सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थ विज्ञान)	प्रथम
३९.	कु. साराह खान अयुब खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	दलितमित्र पंढरीनाथ पाटील सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थ विज्ञान)	प्रथम

१	२	३	४	५
४०.	कु. साराह खान अयुब खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व. शरद नरसिंह आचार्य स्मृती रौप्यपदक	विज्ञान स्नातक (पदार्थ विज्ञान)	प्रथम
४१.	कु. आकांक्षा प्रमोद पिंजरकर, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट, जि. अकोला.	श्रीमती भीमाबाई पंजाबराव जगताप (लोणीकर) सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (रसायनशास्त्र)	प्रथम
४२.	कु. वैदेही अश्विन देशपांडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	श्री यशवंत माणिकराव वानखडे रोख पारितोषिक रु. ४५०/-	विज्ञान स्नातक (गणित)	प्रथम
४३.	कु. वैदेही अश्विन देशपांडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	स्व.नारायण कृष्ण गोडबोले रोख पारितोषिक रू.४५०/-	विज्ञान स्नातक (गणित)	प्रथम
४४.	कु. वैदेही अश्विन देशपांडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	स्व. मधुकर गोविंद जोशी रौप्यपदक	विज्ञान स्तानक (गणित)	प्रथम
४५.	कु. मयुरी राजेंद्र कथलकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती	स्व.प्राचार्य डॉ.जे.एल.श्रीमाळी स्मृती रोख पारितोषिक रू.९००/-	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र)	प्रथम
४६.	कु. वेदश्री किसनराव गुजर, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगावसुर्जी.	स्व. श्री एन.जे. रोंघे स्मृती सुवर्णपदक	सर्व स्नातक परीक्षांमध्ये सर्वाधिक टक्केवारीने सर्वोच्च गुण (विज्ञान स्नातक)	

१	२	३	४	५
४७.	कु. मदीहा महरोश मोहम्मद साकीब, पदव्युत्तर गणित विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	स्व.प्राचार्य आर.के.सोनुने स्मृती रौप्यपदक	विज्ञान पारंगत (गणित)	प्रथम
४८.	कु. पूर्वा विनायक गाडे, पदव्युत्तर शैक्षणिक जीवतंत्रज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	डॉ.बिजरंका भगवंतराव कडू उपाख्य डॉ.बी.बी.कडू रौप्यपदक	विज्ञान पारंगत (जीवतंत्रज्ञान)	प्रथम श्रेणीसह प्रथम
४९.	कु. साराह खान अयुब खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.डॉ.श्रीपाद वामनराव चिंचाळकर (डि.एससी.) स्मृती सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थ विज्ञान)	प्रथम
५०.	कु. आचल अनिलकुमार शर्मा, पदव्युत्तर पदार्थविज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	स्व.बकारामजी पांडुजी ठाकरे स्मृती सुवर्णपदक	सर्व विषयांच्या विज्ञान पारंगत परीक्षांमध्ये टक्केवारीने सर्वाधिक गुण एंम.एससी. (वनस्पतिशास्त्र)	प्रथम
५१	कु. अंकिता अनिल बेलेकर, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	प्रा.एन.एस.भावे रौप्यपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र)	प्रथम
५२.	कु. मयुरी राजेंद्र कथलकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	स्व.डॉ. स्मिता अशोक डांगरे (पुंड) स्मृती रौप्यपदक	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र)	प्रथम

१	२	३	४	५
५३.	कु. आचल अ्निलकुमार शर्मा, पदव्युत्तर पदार्थविज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	डॉ. के.जी. देशमुख - प्रथम कुलगुरू अमरावती विद्यापीठ, सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (पदार्थ विज्ञान)	प्रथम
५४.	कु. कांचन नानकराम मंगतानी, श्री राधाकिसन तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व. पंजाबराव उर्फ दादासाहेब धनवटे सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (सूक्ष्मजीवशास्त्र)	प्रथम
५५.	कु. सानिआ तसमिम सय्यद महेमुद, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	डॉ. ज्ञानदेव लक्ष्मणराव डाहाके सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
५६.	कु. सानिआ तसमिम सय्यद महेमुद, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	कै.प्रा. भालचंद्र दादाराव देशमुख रोख पारितोषिक	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
५७.	कु. अंकिता अनिल बेलेकर, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	श्रीमती रमाबाई उपाध्ये सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र)	प्रथम
